# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४.

क्र.कोविमं/उ.मा.गोप/स्विकृती/मार्च २०२४/ 1815
दिनांक : ०६/१०/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) फेब्रु - मार्च २०२४ परीक्षक/नियामक नेमणुकीबाबत तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती पाठवणेबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र.को.वि.मं./ १२ वी गोप/ पॅनेल २०२२-२४/१५४८, दि. २५/१०/२०२१.**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) फेब्रु/मार्च-२०२४ परीक्षेसाठी उत्तरपत्रिका परीक्षणाकरीता परीक्षक/नियामक नेमणुकीबाबत आपणाकडून उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झालेल्या शिक्षक माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकांची माहिती / यादी या पत्रासोबत विहित नमुन्यात आपणाकडे पाठविण्यात येत आहे. सदर माहिती पडताळणी करण्याबाबत खालील सुचनांचे अनुपालन करावे.

१) आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील काही विषयांसाठी शिक्षकांच्या नावाचा समावेश यादीमध्ये झाला नसल्याचे निदर्शनास येत असल्यास अशा सर्व शिक्षकांची माहिती लाल बॉलपेनने संपूर्ण नावासह शिकवत असलेला विषय, माध्यम, परीक्षक/नियामक टर्न, सेवानिवृत्ती दिनांक,मोबाइल नंबर इत्यादी माहीती नोंदवून संबंधितांची स्वाक्षरी घ्यावी. प्राप्त होणा-या माहितीची आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्रोफाईलमध्ये भरलेल्या माहितीशी पडताळणी करावयाची असल्याने उपरोक्त प्रमाणे नावे नोंद करताना प्रोफाईलमध्ये भरलेल्या माहितीपैकी एकाही पात्र शिक्षकाचे नांव नोंदवावयाचे राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

२) यादीतील शिक्षकांची आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातून दुसऱ्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बदली झाली असेल अथवा दुसऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातून आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात नियुक्त झालेल्या शिक्षकांच्या नावासमोर संपूर्ण तपशीलासह लाल बॉलपेनने नोंदी (कॉलेज सांकेतांक ) कराव्यात.

३) **यादीतील शिक्षकांचे संपूर्ण नाव (इंग्रजी स्पेलिंगसह) त्याचबरोबर शिकवीत असलेले विषय, माध्यम, मोबाइल नंबर, इत्यादी सर्व माहिती बरोबर आहे का? याची खात्री करावी. यादीच्या शेवटी प्राचार्य यांनी नाव, स्वाक्षरी व मोबाईल नं. नमूद करणे बंधनकारक आहे.**

४) **आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात एकच शिक्षक अन्य विषय शिकवीत असल्यास अशा शिक्षकांची इतर विषयांसाठी माहिती पाठवावी, मात्र त्यास कोणत्या विषयासाठी नियुक्ती हवी आहे, त्या विषयासमोर शेरा या कॉलममध्ये नमुद करावे.** मंडळाकडून आवश्यकतेनुसार अशा शिक्षकांना अन्य विषयासाठीही नियुक्ती दिली जाऊ शकते. अशा शिक्षकांना दोन्ही विषयांच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे काम करणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी. **(उदा. कला व वाणिज्य शाखेतील विषयांना परीक्षक संख्या कमी पडत असल्यास अशा विषयाच्या शिक्षकांना दोन्ही विषयांमध्ये नियुक्ती दिली जाईल याची नोंद घ्यावी.)** कला व वाणिज्य विषयाच्या इंग्रजी माध्यमाच्या (सेमी) उत्तरपत्रिका या विषयाच्या मराठी माध्यमातून अध्यापन करणा-या शिक्षकांनाही परीक्षक म्हणून मूल्यमापनासाठी दिल्या जातील.

५) उत्तरपत्रिकांचे गठ्ठे प्राप्त झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत कोणताही गठ्ठा मंडळाकडे परत पाठवू नये.आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात संबंधित विषय शिकविला जात असल्याने प्राप्त झालेला गठ्ठा प्राचार्यांनी त्यांच्या स्तरावर पर्यायी व्यवस्था करून तपासून घेणे क्रमप्राप्त आहे याची नोंद घ्यावी. सदर पर्यायी व्यवस्थेबाबत मंडळास अवगत करण्यात यावे.

६) ब-याचशा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये उत्तरपत्रिका तपासणीसाठी पाठविण्यात येतात तेंव्हा असे निदर्शनास येतेकी उत्तरपत्रिकांचे गठ्ठे प्राप्त झाल्यानंतर संबंधित विषयाचे शिक्षक नोकरी सोडून गेल्याचे सांगितले जाते. अशा वेळी सदरच्या उत्तरपत्रिकांची तपासणी करून घेण्याची जबाबदारी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

७) ब-याच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य/उपप्राचार्य व पर्यवेक्षक हे विषय शिकवितात मात्र ते प्रशासकीय कारणास्तव उत्तरपत्रिका तपासणीस नकार देतात. उपलब्ध शिक्षक कमी पडल्यामुळे उत्तरपत्रिका तपासणी वेळेत होत नाही. शासन आदेशानुसार मार्च परीक्षेच्या निकालानंतर लगेच पुरवणी परीक्षा घ्यावयाची असल्याने मार्च परीक्षेची निकाल प्रक्रिया तातडीने पार पाडावी लागणार आहे. तसेच मान्यताप्राप्त शिक्षकांनीच उत्तरपत्रिका परीक्षण / नियमनाचे काम करावयाचे असल्याने आवश्यकतेनुसार प्राचार्य/उपप्राचार्य व पर्यवेक्षक यांना उत्तरपत्रिका तपासणीचे काम देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

८) उपरोक्त यादी संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून त्यावर सर्व शिक्षकांची स्वाक्षरी घ्यावी.शिक्षकांची स्वाक्षरी घेताना खालील सूचना त्यांना अवगत करून अद्ययावत माहिती सादर करावी.

अ) शासनाच्या म.खा.शा.सेवाशर्ती नियम १९८१ मधील सेवकाचे कर्तव्य नियम क्रमांक २२(१) अंतर्गत मधील अनुसूची (अ) मधील ४ (१८, १९) नुसार सर्व शिक्षकांना मंडळाच्या परीक्षेचे काम स्विकारणे अनिवार्य आहे. त्यामुळे **पाठविलेल्या नियुक्त्या स्विकारणे सर्व शिक्षकांना बंधनकारक राहील** याची संबंधितांना जाणीव करून द्यावी.

ब) जे शिक्षक परीक्षेचे काम अपरिहार्य असताना माहिती भरण्यास टाळाटाळ करतील अगर माहिती भरणार नाहीत त्यांचेवर संस्थेमार्फत कारवाई करून त्याची माहिती या कार्यालयाकडे पाठवावी. याबाबत तत्परता दाखविण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील.

क) अपूर्ण माहिती, अर्थबोध न होणा-या अगर अर्धवट माहितीच्या पत्राबाबत होणा-या संभाव्य अनिष्टास संबंधित प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

ड) ज्या परीक्षक/नियामक यांच्यावर मंडळ शिक्षासूचीनुसार प्रतिबंधात्मक कारवाई झाली असेल, त्यांची स्वाक्षरी न घेता त्याच प्रपत्रात लाल शाईने शेरा या कॉलममध्ये शेरा लिहून कळवावे.

इ) जे शिक्षक सेवानिवृत्त, मयत झालेले आहेत, अगर नजिकच्या काळात जून २०२४ पूर्वी सेवानिवृत्त होणार आहेत, विषय शिकवित नाहीत, गंभीर आजारग्रस्त (उदा. कॅन्सर, टी.बी., हृदयाचे ऑपरेशन) किंवा अभ्यासमंडळ सदस्य असतील अशांची माहिती या कार्यालयास शेरा या कॉलममध्ये लाल शाईने नमूद करावी. याबाबत समाधानकारक पुरावा जोडावा.

ई) सदरच्या संगणकीय यादीमध्ये काही जेष्ठ परीक्षकांना आवश्यकतेनुसार इंग्रजी व मराठी माध्यमासाठी नियामक म्हणून बढती देण्यात आलेली आहे, यासंदर्भात संबंधित शिक्षकांना अवगत करण्यात येऊन स्वाक्षरी घेण्यात यावी. सदर शिक्षकांच्या माहितीमधून काही दुरूस्त्या असल्यास त्या लाल शाईने त्याच संगणकीय फॉर्ममध्ये त्याच जागी नोंदवाव्यात.

उ) यापूर्वी ज्या शिक्षकांनी प्रमुख नियामक म्हणून काम केले आहे अशा शिक्षकांची परीक्षक / नियामक म्हणून काम करण्याची तयारी असेल तर त्यांना अनुक्रमाने आवश्यकतेनुसार काम देण्यात येईल.

९) एम.सी.व्ही.सी. विषयाच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी विषय शिकविणा-या शिक्षकांचीच नांवे कळवावीत. निदेशकाची नांवे कळवू नयेत.

**शास्त्र व तंत्र प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती**

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४ साठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक नियुक्तीकरीता सोबतची शिक्षक माहिती विषयनिहाय पडताळणीसाठी या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. या यादीमध्ये सर्व विषयनिहाय शिक्षक (प्रात्यक्षिक परीक्षा) असल्याचे खात्री करून समाविष्ठ नसलेल्या शिक्षकांचा समावेश करावा. संबंधितांची स्वाक्षरी घ्यावी. एम.सी.व्ही.सी. विषयाच्या शिक्षकाचे माहिती पडताळणी करताना निदेशकांचेच नाव असल्याचे खात्री करावे नसल्यास समावेश करावा. अंतर्गत/ बहिस्थ परीक्षकांच्या नियुक्ती अभावी परीक्षा घेण्यास अडचण निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून आपली राहील.**

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता १२ वी ला शिकविणा-या सर्व शिक्षकांची विषयनिहाय माहिती देणे आवश्यक असल्यामुळे सर्व शिक्षकांची माहिती यादीमध्ये असणे आवश्यक आहे. काही कनिष्ठ महाविद्यालये काही शिक्षकांची माहिती पाठवित नाहीत असे मंडळाच्या निदर्शनास येत आहे. ही बाब योग्य नाही. अशी बाब निदर्शनास आल्यास त्यांची मंडळाकडून गंभीर दखल घेऊन संबंधित कनिष्ठ महाविद्यालयावर मंडळ नियमानुसार त्यांचा सांकेतांक क्रमांक काढून घेण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

महत्वाचे :

**वरील सूचना तथा माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्यांच्याच नावासमोर स्वाक्षरी घेण्यात यावी. वरीलप्रमाणे शिक्षकांची परीपूर्ण माहिती / स्विकृतीपत्रे कोणत्याही परिस्थितीत संबंधित वितरण केंद्रावर शुक्रवार, दिनांक २७.१०.२०२३ रोजी हस्तपोहोच अथवा मंडळ कार्यालयात हस्तपोहोच शुक्रवार, दिनांक २७/१०/२०२३ पर्यंत न चुकता जमा करावीत. उशीरा सादर केल्या जाणाऱ्या माहितीसाठी दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.**

सोबत - विहीत नमुन्यातील संगणकीय शिक्षक माहिती यादी. (लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा).

(पोवार डी. एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रत :-

१) मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद कार्यालय, सातारा/सांगली/कोल्हापूर.
३) अधिक्षक, वेतन विभाग, वेतन विभाग कार्यालय, सातारा/सांगली/कोल्हापूर.